# अहंकारी रातकिडा

अनघा हिरे



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com
प्रकाशन --- २३ एप्रिल २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# अहंकारी रातकिडा


## अनघा हिरे

संपर्क --- anagha.hiray@gmail.com

९४२२२८४११६

# अहंकारी रातकिडा

कोणे एके काळी रातकिडा मस्त पैकी उंच उंच उडायचा.. हो खरच उडायचा
तो मधमाशी पेक्षा जास्त वेगाने उडत होता
तो घारीपेक्ष्या उंच उडत होता
आणि तो एका वैमानिका सारखा फक्त उडण्यातच रस घेत होता.



तो जगभर फिरला होता
तो पूर्वेकडे उडला होता .
मग पश्चिमेला उडला होता .
आणि नंतर दक्षिण दिशेला गेला
पण तो उत्तर दिशेला काही उडू शकला नाही
त्याच्या मनात उत्तर दिशेला जाण्याची जाम इच्छा होती .
त्याची एक मैत्री होती मुंगी . तो तिला नेहेमी सांगायचा कि
मला एकदातरी उत्तर दिशेला उडायचे आहे.

मुंगीने त्याला बजावले कि, ‘उत्तरेकडे जाण्याचा तू प्रयत्न करू नकोस कारण उत्तर दिशेला खूप थंडी असते. आपल्यासाठी ती जागा योग्य नाही . इतक्या थंडीत आपल्या सारखे कीटक तिथे राहू शकत नाही.

त्याने मुंगीचे काही ऐकले नाही

रातकिडा म्हणाला “रातकिडा तेच करतो जे त्याला करायचे असते.”

त्याने रात्रीतून उत्तर दिशेला जायचे ठरवले . रातकिड्याचे उडणे तर काय आपल्याला माहीतच आहे किती जलद आहे ते झोप न काढता तो वेगात उडत राहिला  कुणाचा विश्वास बसणार नाही इतका तो वेगात उडत होता

रात्र भर उडत उडत तो  शेवटी उत्तर दिशेला पोहोचलाच.
सकाळ झाली रातकिडा चिनार वृक्षावर उतरला .
त्याने बघितले सर्वत्र बर्फ होता
झाडांवर बर्फ होता
जमिनीवर बर्फ होता.
आणि पर्वतावर सुद्धा बर्फ होता.



एक बारशिंगा मंद गतीने त्याच्या जवळ चालत आला
“नमस्कार हो!” बारशिंगा पुटपुटला. ‘ इथे तू नवीन दिसतोय चल माझ्या घरी माझ घर डोंगरातल्या गुहेत आहे तिथे थंडी नाही वाजत.’

परंतु रातकिड्यांचे त्याच्या बोलण्याकडे लक्षच नव्हते.रातकीड्याने त्याच्याकडे लक्ष दिले नाही याचा बाराशिंग्याला फार राग आला. त्याने आपल्या शिंगांनी रातकिड्याला उडवले.रातकिडा बर्फात जाऊन पडला.तो परत उडत झाडावर बसला.तो बाराशिंग्या बरोबर त्याच्या घरी गेला नाही.
रातकिडा म्हणाला “रातकिडा तेच करतो जे त्याला करायचे असते.”
रातकिड्याने तेच केले जे त्याला करायचे होते.

रात्रीचा थकवा त्याला नवीन जागेवर आलो म्हणून काही जाणवला नाही.
तो दिवस भर सगळीकडे खूप फिरला त्याने उंच उंच पर्वत बघितले
त्याने उंच उंच झाड बघितली.

छान छान फुलांच्या बागा बघितल्या.

वाटेत त्याला एक घुबड भेटले. त्याच्या मागे मागे  घुबड सुद्धा लाबूनउडत आले होते ‘आता थंडीच्या रात्री पासून आपण सुरक्षित जागा शोधली पाहिजे’ अस घुबडाने रातकिड्याला सांगितले
पण रातकिड्याने त्याचे ऐकले नाही.

रातकिडा म्हणाला “रातकिडा तेच करतो जे त्याला करायचे असते.”
त्याने झाडावरच विश्रांती घेण्याचे ठरवले. तो सकाळ पर्यंत चिनार वृक्षावरच झोपला.
सकाळी जेव्हा तो उठला तेव्हा तो घरी जाण्यासाठी तयार झाला. आता घरी जाऊन मुंगीला आपले कारनामे सांगावे. पूर्ण प्रवास आपण किती मजेत घालवला हे तिला सांगू या विचारात तो होता.

परत उंच भरारी घेऊन तो उडायाला तयार झाला त्याने उंच भरारी घेतली परतू तो जमिनीवरील बर्फात येऊन पडला . त्याने पुन्हा पुन्हा उडण्याचा प्रयत्न केला. थंडीमुळे त्याचे पंख पार गारठून गेले होते  त्याने  आपल्या पंखाना चोळून उबदार करायचा प्रयत्न केला पण काहीही उपयोग झाला नाही .

आता तो उंच उड्यामारून चालू लागला. उड्या मारतच तो आपल्या घरी पोहोचला  . दिवसामागून दिवस गेले पण त्याचे गोठलेले पंख काही बरे झाले नाही.
त्याने आता परत ते पंख चोळण्याचा पर्यंत केला. जेव्हा जेव्हा तो आपले पंख चोळायचा त्याच्या पंखांचा कीर्... कीर्.... असा आवाज यायला लागला .
आता त्याचे पंख पूर्वी इतके गोठलेले नाही परंतु तो आता उडू शकत नाही तो आता फक्त उंच उंच उड्यामारतो.

अजूनही रात्र झाली कि त्याला आपल्या उडण्याची आठवण येते आणि तो आपले पंख उबदार करण्यासाठी चोळतो . रात्रीच्या वेळी आपण त्याच्या पंखांचा कीर् कीर् असा आवाज ऐकतो.

रातकिडा उडू शकत नाही पण तो उंच उंच उड्यामारतो

कारण त्याने कुणाचे ऐकले नाही आणि त्याला वाटले तसेच त्याने केले .

आता रातकिडा म्हणत नाही “रातकिडा तेच करतो जे त्याला करायचे असते.”



# माकडाचे घर

एका गावात भरपूर माकडे राहत होती भरपूर म्हणजे माकडांच्या किमान तीन चार पिढ्या एकत्रच राहत होत्या. गावातल्या माकडांना जंगलात काही आवडत नसे. गावातच त्यांना करमत होते. गावातील माणसांना सुद्धा माकडांची फार सवय झाली होती माकडं माणसांना घाबरत नसे कि माणस माकडांना .
सगळ्यांचा एकत्रच वावर असायचा माणस माकडांना आपल्या हाताने काहीपण खाऊ खायला देत. माकडं सुद्धा अगदी माणसांच्या अंगा  खांद्यावर बसून खाऊ खात आणि खेळत.
असच माणसांच्या जमावात खेळत असतांना बंटी माकडाने त्यांचे बोलणे मनपूर्वक एकले कि, ‘माकड हे माणसांचे पूर्वज आहेत.’
हे ऐकल्या नंतर बंटी जाम खुष झाला.
आपणही माणसां प्रमाणे हुशार आहोत. आता माणसं जशी वागतात तसेच आपणही वागू या.अस बंटीने ठरवलं माणूस छानश्या घरात राहतो व त्यामुळे तो स्वतःला सुरक्षित समजतो सर्व प्रथम सर्व माकडांनी घरच बांधावे व माणसां प्रमाणे स्वतःला सुरक्षित करावे. आपल्या मनातली कल्पना आपल्या सर्वच मित्र कंपनीला समजावून सांगणे त्याला आवश्यक वाटू लागले.



बंटीने आज ठरवले कि सगळ्यांना बोलवून त्यांना आपल्या भविष्याबद्दल जरा विचार करायलाच लावायचा शेवटी किती काही झाले

तरी लोक आपल्याला माणसाचे पूर्वज म्हणतात म्हणजे माणसां इतकीच आपल्याकडे बुद्धी असू शकते त्याचा वापर हा केलाच पाहिजे माणसांनी

मोठमोठी घरे बांधली आहे आणि आपले माकड बांधव अजूनही झाडावरच लटकत बसलेले आहे, ते काही नाही आज सगळ्यांना एकत्रच या गोष्टीची जाणीव करून दिली पाहिजे.

बस.....

बंटीने एखादी गोष्ट डोक्यात घेतली कि मग तो ती पूर्ण केल्या शिवाय काही थांबत नसे.

ठरल्या प्रमाणे सर्व माकडे वडाच्या झाडावर जमले. बंटी सर्वाना आपले विचार पटवून देत होता ,आपल्या सुरक्षितेसाठी आणि पुढील पिढीच्या भविष्यासाठी आपण घर बांधलेच पाहिजे.

फांदीला लटकत लटकत आणि अंग खाजवत खाजवत सगळ्यांनी बंटीच्या म्हणण्याला होकार दिला.

चंगू माकडीण आपल्या पिल्लाच्या केसात अडकलेले किडे काढण्यात मग्न होती तरी एकीकडे ती बंटीचे म्हणणे एकत् होती. तिने बंटीला सुचवले ‘हे बघ , आपण आत्ता पर्यंत सगळे एकत्रच झाडावर राहत आलोय आता माणसांप्रमाणे वेगवेगळे राहण आपल्याला शक्य नाही एकत्र राहिलो तर आपण इतरांपासून सुरक्षित राहू शकतो.चंगूचे म्हणणे सर्वाना पटले. तिच्या म्हणण्यावर तोडगा म्हणून ढब्बू आजोबांनी एक उपाय सुचवला खूप सारे घर बांधण्यापेक्षा आपण जर फक्त एकच मोठ घर बांधल

तर आपल्याला सर्वांना एकत्रच राहता येईल आणि चंगूनी सांगितल्याप्रमाणे आपले इतरांपासून रक्षण हि होईल.
मन्नू माकड सर्वांचे बोलणे नीट ऐकूण घेत होता आणि माकडांच्या ह्या वायफळ चर्चेचे त्याला हसू येत होते कारण माणसांप्रमाणे हुशारीने वागणे आपल्या सारख्या भोळ्या भाबड्या प्राण्यांना

जमणार नाही हे त्याला माहित होते . त्यामुळे घर बांधून स्वतः पुरते बघणे आपल्याला जमणार नाही याची जाणीव तो सगळ्यांना करून देऊ इच्छित होता परंतु.... सगळे इतके उत्साहात होते कि आता उत्साहाच्या भरात उद्यालाच घर बांधून पूर्ण करतील कि काय अस वाटत होते.
कल्लू माकडाने उत्साहात सांगितले कि काही झाले तरी उद्या सकाळी सकाळी आपण जमुच आणि घर बांधणीला सुरवात करू .
कल्लुच्या बोलण्याला सहमती दर्शवत सगळ्यांनी उद्या सकाळी एकत्र येऊन काम फत्ते करायचे ठरवले .
आता प्रश्न होता घर बांधायचे कुठे तर कल्लुने नदी जवळच्या मोकळ्या जागेत घर बांधूया असे सुचविले
खरच नदी जवळ छानशी मोकळी जागा होती जवळच पेरू, केळी आंब्याची बाग होती म्हणून त्या जागेवर घर बांधायचं सर्वांनी एकमताने ठरवलं
दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी सर्व माकड ,माकडीण आपापल्या पिल्लांसह वडाच्या झाडावर जमले. आणि सकाळी सकाळी सर्वांचा मोर्चा नदी जवळील मोकळ्या जागेत वळला. केळीचे ,आंब्याचे आणि पेरूचे झाड बघितल्यावर सर्वांना खूप आनंद झाला

आधी जरा थोडीशी न्याहारी करून घ्यावी आणि मगच कामाला लागावे असा विचार करत माकडं आपली फळ खाण्यात मग्न झाली कधी पेरू कधी आंबा कधी केळी असा एक एक करून फळांचा आस्वाद  घेता घेता पार संध्याकाळ उलटली. अंधार पडल्यावर आपापल्या झाडावर परत जाण्यासाठी सगळे निघाले तेव्हा त्यांच्या लक्षात आले कि आपण आज घर बांधण्यासाठी एकत्र जमलेलो होतो आणि घर काही बांधून झालेच नाही.

माकडांची सर्व पिल्ले तर आज फार दमली होती कारण भरपूर अश्या झाडांवर नदीच्या पाण्यात खेळण्यात त्यांचा दिवस गेला होता. त्यामुळे आज ते भारीच खुष होते. उद्या परत येऊन आपण घर बांधणीसाठी सुरुवात करू असे मोठे माकडं बोलली. यावर पिल्लांना मनातून खूप आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी परत सर्व माकडे नदीकिनारी जमली.परत एकदा त्यांना त्या गोड गोड फळांनी भुलवले आणि माकडं परत फळ खाण्यास त्या झाडांवर गेली. माकडांनी परत दिवसभर तिथे धुडगुस घातला. दिवसा मागून दिवस गेले माकडं रोज येत आणि घर बांधायचे पार विसरून जाऊन खेळण्यातच मग्न होत.



बंटी काही शांत बसणाऱ्यां पैकी नव्हता त्याला आपल्या मित्रांची फार काळजी वाटू लागली. काहीतरी उपाय काढलाच पाहिजे असा त्याने विचार केला. काही नाही तर किमान गावातल्या पडक्या मंदिराचा सहारा घ्यावा. घर बांधण्याचा बेत तूर्त बाजूला ठेवून देऊया, आणि सर्वांच्या सुरक्षितेसाठी आता पडक्या


©ई साहित्य प्रतिष्ठान

मंदिरालाच आपले घर बनवावे असा विचार त्याच्या मनात आला म्हणून आज तो सर्वांना घेऊन पडक्या मंदिरात आला. मंदिरातल वातावरण एकदम शांत आणि थंड होते. सर्व माकडांना जागा फार आवडली. मंदिरातली तुटकी घंटा पिल्लांचे आकर्षण बनली . सगळे त्याला लोमकाळू लागले. आज पासून आपण इथेच राहायचे अस सर्वांनी एकमताने ठरवले.

ठरलं तर मग दिवसभर फिरायचे आणि रात्र झाल्यावर सर्वांनी ह्या मंदिरात यायचं. सुरवातीच्या दिवसांमध्ये सर्वांनाच मंदिराचे आकर्षण

वाटत होते. कालांतराने सगळे मंदिराला कंटाळले. झाडावर राहण्यात जो मोकळे पणा वाटत होता तो ह्या बंदिस्त मंदिरात वाटत नव्हता.

हळू हळू माकडं त्या मंदिरात जायेनाशी झाली मंदिर पुन्हा ओस पडू लागले. आता माकडं पुन्हा एकदा मनमोकळे पणे आपल्या झाडावर राहायला लागले. शेवटी मन्नू माकड ही गोष्टी आधीच जाणून होता त्यामुळे त्याला ह्या गोष्टीचे विशेष काही वाटले नाही त्याने सर्वांना हि गोष्ट स्पष्ट केली कि आपल्या सर्व पिढ्या ह्या झाडावरच राहण्यात गेलेल्या आहेत आणि आपण सुद्धा झाडावरच राहणार .




©ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य